# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

**दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९** **ई-मेल: directorcrs78@gmail.com**


जा.क्र. म.सं.के./तांत्रिक/1779 /२०२२ दि. 15 / 03 /२०२२

## निविदा सूचना

**विषय:- सन २०२२-२३ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर (कोटेशन) बोलविण्याबाबत.....**

**संदर्भ:** कुलसचिव कार्यालय जा.क्र.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/ दि. २२ जून, २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी.

३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. निविदा/कोटेशन मधील संबंधित तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जवाबदार राहणार नाही.

५. कंत्राट पद्धतीने कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.

६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी कडे संबंधित तांत्रिक कामची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/परवाना व कामाचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

७. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन सुट्या भागांचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

८. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

९. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित देण्यात आलेली तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावी, कामाबाबत कर्मशाळा विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१०. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

११. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१२. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामाकरिता पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कामगाराचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कंत्राटी कामगाराचे देयक पारित करण्यात येईल.

१३. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष तांत्रिक कामगारांना, कामगार (Labour Act) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे इत्यादीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख कृषि शक्ती व औजारे, मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे हि एक वर्षामधील खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामाकरिता असून कंत्राटी तांत्रिक कामगाराचे दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१६. मध्यवर्ती संशोधन केंद्र कार्यालय अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१७. कंत्राटदारास देय रक्कमेच्या १० टक्के रक्कम अमानत रक्कम म्हणून प्रभारी अधिकारी यांचेकडे जमा करावी लागेल.

१८. कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचेकडे राखून ठेवेलेले आहेत.

१९. निविदा प्रक्रिया राबवितांना तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण आल्यास निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर थांबविण्याचे अथवा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचेकडे राखून ठेवेलेले आहेत.

२०. समान निविदा असल्यास त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. या बाबत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला तसेच निविदा समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

२१. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु. १०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२२. कंत्राटदार अथवा कंत्राटदाराकडून पुरविण्यात येणारे कंत्राटी कर्मचारी/मजूर विद्यापीठाकडे कायमस्वरूपी नेमणूकी करिता दावा करण्यास पात्र राहणार नाही.

२३. निविदा धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची जवाबदारी त्यांची स्वताची राहील खोटे कागदपत्र सादर केल्याचे कोणत्याही टप्प्यावर दिसून आल्यास ते अटीशर्तीचा भंग समजून त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल.

२४. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. **२५.०३.२०२२** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

15-3-2022

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कर्मशाळा विभाग (ट्रक्टर युनिट) संबंधित तांत्रिक कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा प्रकार | दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ट्रक्टर, जीप, मिनी ट्रक, पिकअप, ट्रक व इतर वाहने दुरुस्ती | प्रति दिन/८ तास | कनिस्ठ यांत्रिक |
| २ | मेक्यानिक व वेल्डर यांचे वाहने, कृषि औजारे, यंत्र दुरुस्ती कामामध्ये मदत करणे | प्रति दिन/८ तास | कुशल मदतनीस |
| ३ | वाहनांचे, कृषि औजारे ई. चे वेल्डिंग कामे तसेच कृषि औजारे व यंत्रे यांची दुरुस्तीची कामे | प्रति दिन/८ तास | कनिस्ठ यांत्रिक (वेल्डर) |
| ४ | वाहनांची पंचर दुरुस्ती | प्रति दिन/८ तास | ट्रक्टर, कार, जीप, मिनी ट्रक, पिकअप, ट्रक व इतर वाहने व यंत्रे |
| ५ | जीप, कार, मिनी ट्रक, पिकअप, ट्रक व इतर वाहने चालवणे | प्रति दिन/८ तास | वाहन चालक (वैध परवानाधारक) |
| ६ | ट्रक्टरने शेती संबंधित तिन्ही हंगामातील कामे करणे | प्रति दिन/८ तास | ट्रक्टर चालक (वैध परवानाधारक) |
| ७ | जेसीबी संबंधित सर्व कामे | प्रति दिन/८ तास | जेसीबी चालक/ऑपरेटर |
| ७ | कार्यालयातील दैनंदिन कामे जसे कार्यालय उघडणे व बंद करणे, कार्यालयात साफसफाई ठेवणे, डिझेल वाटप ई. | प्रति दिन/८ तास | मजूर |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता